FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

0154181

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No. 22, वर्ष Year 2022, दिनांक Date 31/03/22

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र. अधिनियम १९८८, कलमे Sections ८
(ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day ........, तारीख पासून Date from 26/03/22, वेळ Time ........, तारीख पर्यंत Date to 30/3/22, वेळ Time 16.42 वा.

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date ........, वेळ Time ........

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ९६, तारीख Date 31/03/22, वेळ Time ६.३० वा

4. माहितीचा प्रकार Type of Information : ........, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P. S. ३० कि. / उत्तरेस, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. ........

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name पी/नॉर्थ वार्ड, ठिकाणाचे नाव if any मनपा कार्यालय मालाड (प), गल्ली Ward क्र-६४, रस्त्याचे नाव Name of road ........
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name श्रीमती शर्मिला खरे (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name रामदास खरे

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ........ (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ८८३३८९५५९६

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation समाजसेवक

(g) धर्म Religion हिंदू, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........

(h) पत्ता Address : गल्ली / वार्ड नं. Ward बि २ रूम नं. ३२४, घर / नाव नं. House/Name No. प्लॉट नं ४, फोन / मो. नं. Phone/Mo. No. ........ पॅन नं. PAN No. ........ वोटर्स नं. Card No. ........
रस्त्याचे नाव Road उत्तम कलेक्टर कंपाऊंड, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village मालाड, पोस्ट Post मालवणी, मुं-६४, पो स्टे P.Stn. ........
तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........, सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

१) रितेश मनोहरलाल गायकवाड, कनिष्ठ अभियंता, २) पुंडलिक सावंत, जलमापक पर्यवेक्षक, ३) पटेल, मोटार रिडींग निरीक्षक, ४) शरद क्षीरसागर, कदम (शिपाई), सर्व कार्यरत सहा. अभि (जलकामे) पी नॉर्थ मनपा कार्यालय मालाड (प) मुं-६४

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

Scanned with OKEN Scanner

फिर्याद
दिनांक ३१/०३/२०२२

श्रीमती. शर्मिला रामदास खरे, वय–५० वर्षे, धंदा–समाजसेवक,रा.ठि. बीट रूम नं. ३२४, फ्लॅट नं. ५, जुना कलेक्टर कंपाऊंड, मालवणी मालाड (पश्चिम), मुंबई – ९५, मोबाईल क्र. ९८३३८१७७१६.

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर लहानपनापासुन कुटुंबियासह रहावयास आहे. मला समाजसेवेची आवड असल्याने आमच्या परिसरातील रहाणाऱ्या लोकांचे पाण्याचे, रेशनिंग कार्ड, इत्यादी काम करण्याकरीता त्यांची मदत करीत असते.

दिनांक २२/०२/२०२२ रोजी आमच्या परिसरात राहणारे इसम नामे काशिनाथ संगम बिदरकुंडई, रा.ठि. रूम नं. क्यु ८७/ए, जय मल्हार चाळ, अंबुज वाडी, गेट नं. ८, आझादनगर मालवणी, बाबा मशिद जवळ, मालाड (पश्चिम), मुंबई ४०००९५ यांनी मला त्यांच्या घरासाठी नवीन नळ कनेक्शन करण्यासाठी मदत कराल का अशी विचारणा केली असता मी त्यांस होकार दर्शविला. सदरचे काम करण्याकरीता लेखी पत्र त्यांनी मला लिहुन दिले.

दिनांक २८/०३/२०२२ रोजी सहा. आयुक्त कार्यालय, पी/उत्तर वॉर्ड, मुंबई महानगर पालिका या कार्यालयात काशिनाथ संगम बिदरकुंडई यांच्या सहीने नवीन कनेक्शन करीता लागणारी फि रू. ७२०/– व अर्ज भरून सादर केला.

दिनांक २८/०३/२०२२ रोजी नवीन नळ कनेक्शन करीता केलेल्या अर्जाची फाईलची पुर्तता झाली किंवा कसे याबाबत सहा. आयुक्त कार्यालय, पी/उत्तर वॉर्ड, मुंबई महानगर पालिका, मालाड पश्चिम या कार्यालयातील जल विभागात विचारणा केली असता मला समजले की, सदरची फाईल कनिष्ठ अभियंता श्री. जयस्वाल यांच्याकडे कामाकरीता गेलेली आहे. त्यामुळे त्यांच्याकडे जावून सदर फाईलची चौकशी केली असता त्यांनी सांगितले की, सदर फाईलवर त्यांना स्वाक्षरी करावयाची असल्याने त्याकरीता त्यांनी थेट रू. ५,०००/– इतक्या लाचेची मागणी माझ्याकडे केली. तसेच नमुद कार्यालयातील मीटर सुपरवायझर श्रीमती. सावंत यांनी सदर फाईलवर स्वाक्षरी करण्याकरीता माझ्याकडे रू. १,०००/– इतक्या लाचेच्या रकमेची मागणी केली. तसेच नमुद कार्यालयातील मीटर रिडींग निरीक्षक श्री.पटेल यांनी सदर फाईलवर स्वाक्षरी करण्या करिता माझ्याकडे रू. १,०००/– इतक्या लाचेच्या रकमेची मागणी केली व सदर कार्यालयातील सहाय्यक अभियंता श्री शिंदे यांचे कार्यालयीन शिपाई कदम यांनी शिंदे साहेबांची सही घेवून देण्याकरीता रू. २,०००/– च्या लाचेची मागणी केली. परंतु मला लोकसेवक श्री. जयस्वाल, श्रीमती. सावंत, श्री. पटेल व श्री. कदम यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी, दिनांक २९/०३/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे जावून लेखी तक्रार केली.

सदर तक्रारीवर कारवाई करण्याकरीता पो.नि. गायत्री जाधव यांची नियुक्ती करण्यात आल्याचे मला सांगण्यात आले. पो.नि. गायत्री जाधव त्यांच्या कक्षात एक व्यक्ती उपस्थित होती. त्यांनी त्यांची ओळख ही पो.नि. बनगोसावी अशी करुन देवून ते सापळा कारवाई करिता पर्यवेक्षक अधिकारी म्हणून काम पाहतील.

मी वर नमुद केलेला पत्ता हा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्या कार्यालय वरळी मुंबई येथून लांब असल्याने वेळेचा उपव्य टाळणेकामी मला पो.नि जाधव मॅडम यांनी त्यांचे मोबाईल फोन वरूनअन्नपूर्णा बिल्डींगच्या समोर, शकील बगंल्याच्या बाहेर रस्त्यालगत, मालाड (पश्चिम) येथे येण्यास सांगितले. मी तेथे पोहचले असता एक सफेद रंगाची गाडी उभी होते त्यामध्ये पो.नि जाधव मॅडम व पो.नि बनगोसावी यांनीगाडीमध्ये असलेल्या दोन इसम यांची शासकिय पंच व उर्वरीत इसमाची पोलीस पथक अशी ओळख करून दिली. त्यांनतर पो.नि

Scanned with OKEN Scanner

जाधव यांनी श्री. जयस्वाल, श्रीमती. सावंत व शिपाई कदम हे कार्यालयात उपस्थित असल्याची माझ्याकडून खात्री करून घेतली.

त्यांनतर पो.नि जाधव यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन पथकातील एका महिला अंमलदाराच्या मार्फतीने माझे साडीच्या आतील ब्लाऊजला लावुन माझे सोबत पंच श्री. पाटील यांचेसह लोकसेवक श्री. जयस्वाल, श्रीमती. सावंत, श्री.पटेल आणि शिपाई कदम यांना भेटण्याकरीता सहा. आयुक्त कार्यालय, पी/उत्तर वॉर्ड, मुंबई महानगर पालिका या कार्यालयातील जल विभागात येथे पाठविले. तेथील सातव्या मजल्यावरील जलकामे विभागातील लोकसेवक कनिष्ठ अभियंता श्री. जयस्वाल यांना मी भेटले असता, त्यांच्याशी माझे कामासंबधात चर्चा केली, त्यावेळेस लोकसेवक जयस्वाल यांनी '' पहिले घेवुन या... तरच हात लावणार फाईलला'' असे बोलले. त्यानंतर मी लोकसेवक कदम यांना भेटले असता, त्यांनी फाईलवर शिंदे साहेबांची सही घेवुन ठेवण्याकरीता रू.२०००/– इतकी लाचेची मागणी केली. त्यानंतर लोकसेवक पटेल यांना भेटले असता, त्यांनी मला हाताच्या एका बोटाचा इशारा करून ''आणले का पैसे'' असे बोलुन माझेकडे रू. १०००/– इतकी लाचेची मागणी केली. तसेच त्यांनी 'पैसे दिल्याशिवाय सही करणार नाही' असे सांगितले. त्यांनतर मी महिला लोकसेविका श्रीमती सांवत यांना भेटले असता, त्यांनी सुद्धा फाईलवर सही करण्याकरीता रू.१०००/– इतकी लाचेची मागणी केली. त्यांनतर मी पुन्हा कनिष्ठ अभियंता जयस्वाल साहेबांकडे गेली असता, त्यांनी देखील रिपोर्ट बनविण्याकरीता रू. ५०००/– इतकी लाचेची मागणी केली व सदर लाचेची रक्कम लवकर घेवुन येण्यास सांगितले. त्यानंतर मी तेथून निघून गेले व पंच क्र. १ पाटील यांचेसह पायी चालत कोणासही संशय येणार नाही अशा रितीने थांबलेल्या शासकीय वाहनाजवळ आले.

त्यानंतर पो.नि. जाधव यांनी माझे व लोकसेवक जयस्वाल, लोकसेविका श्रीमती सांवत लोकसेवक पटेल, व लोकसेवक कदम यांच्यामध्ये प्रत्यक्ष भेटी दरम्यान झालेले व डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण पो.नि. बनगोसावी, पो.नि. जाधव, मला व दोन्ही पंचाना ऐकविले असता, लोकसेवक जयस्वाल यांनी तक्रारदार माझेकडे नवीन नळजोडणीकरीता भरलेल्या फॉर्मवर सही करण्याकरीता रू. ५०००/—, लोकसेविका श्रीमती सांवत यांनी नमुद फॉर्मवर सही करण्याकरीता रू. १०००/—, लोकसेवक श्री.पटेल यांनी सही करण्याकरीता रू.१०००/—, तसेच लोकसेवक श्री. कदम यांनी शिंदे साहेब यांची सही घेवुन देण्याकरीता रू.२०००/— इतकी लाचेची मागणी करुन ती लवकरात लवकर घेऊन येण्यास सांगुन स्विकारण्याचे मान्य केले.

श्री. जयस्वाल साहेब, श्रीमती. सावंत मॅडम, श्री.पटेल व श्री. कदम यांनी माझ्याकडे लाचेच्या रकमेची मागणी केली असल्याचे केलेल्या पडताळणीमध्ये निष्पन्न झालेने माझेकडे असलेल्या वैयक्तिक बचतीमधील आणलेली रू. ९०००/—लाचेची रक्कमेस पोलीस पथकातील अंमलदार यांच्या मदतीने अँथ्रासिट पॉवडर लावण्यात आली. पो.नि जाधव मॅडम मला योग्य त्या सुचना देवून महिला पोलीस अंमलदार यांच्या मदतीने डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मशीन लावून व लाचेची रक्कम घेवून पंच श्री.पाटील यांना सोबत पाठविण्यात आले. व पाठीमागून पोलीस पथक हे लोकसेवक यांच्या कार्यालयाच्या परिसरात येवून थांबले. मी कार्यालयात गेले असता कार्यालयाच्या कामकाजाचा वेळ संपला असल्याने श्री.जयस्वाल साहेब व श्रीमती. सावंत मॅडम व श्री.पटेल साहेब हे घरी निघून गेले असे तेथे उपस्थित असलेले श्री. कदम यांनी सांगितले मी त्यांना त्यांनी मागणी केलेली रू २०००/— लाचेची रक्कम त्यांच्या हात दिली असता त्यांनी त्यांचे शर्टचे वरच्या डाव्या खिशात ठेवले परंतु माझे पाठीमागे उभे असलेले पंच श्री. पाटील यांना पाहिले व लाचेची रक्कम ही खाली टाकून दिली.

(गायत्री जाधव)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. मुंबई

शर्मिला रामदास खरे

फिर्यादी श्रीमती. शर्मिला रामदास खरे यांचा दि. ३१/०३/२०२२ रोजीची फिर्याद पुढे सुरु....

यानंतर मी लागलीच सातव्या मजल्यावरील मोकळया पॅसेजमध्ये येवून सापळा पथकास दिसेल अशा रितीने लोकसेवकाने लाच रक्कम स्विकारल्याबाबत पुर्व नियोजीत इशारा म्हणुन माझा डावा हात डोक्यावरून फिरवुन सापळा पथकास इशारा दिला. त्यावर लागलीच सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यानीसहा. आयुक्त कार्यालय, पी/उत्तर वॉर्ड, मुंबई महानगर पालिका शिपाई श्री. कदम यांस लाच स्विकारताना रंगेहात पकडुन ताब्यात घेतले. त्यानंतर पो.नि. जाधव यांनी माझे साडीच्या आतील ब्लाऊजला लावलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर पथकातील महिला अंमलदारांच्या मदतीने काढुन तो बंद करुन स्वतःच्या ताब्यात घेतला.

लेकसेवक कदम यांस ताब्यात घेतल्यानंतर पोनि गायत्री जाधव यांनी पंचांसमक्ष वर नमुद लोकसेवक यांना त्यांचे पुर्ण नाव व पदा बाबत विचारणा केली असता, त्याने त्याचे नाव श्री. शरद श्रीधर कदम ( शिपाई ), वय ५० वर्षे असे सांगितले.

त्यानंतर हात तपासण्याची व इतर प्राथमिक कारवाई पी/उत्तर वॉर्ड, मुंबई महानगर पालिका, जल विभाग मालाड पश्चिम, मुंबई येथे पुर्ण करण्यात आली. सदर सहा. आयुक्त कार्यालय, पी/उत्तर वॉर्ड, मुंबई महानगर पालिका कार्यालयात पुढील कारवाई करण्याकरिता आवश्यक जागा व विद्युत पुरवठा उपलब्ध नसल्याने तसेच कारोना संसर्गजन्य आजारामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी येथे जावुन करण्यात येणार असल्याचे पो.नि.गायत्री जाधव यांनी सांगितले. त्यानुसार मी, पंच, लोकसेवक पी/उत्तर वॉर्ड, मुंबई महानगर पालिका शिपाई श्री. कदम यांचे सह लाचलुचपत कार्यालयात आलो व पुढील कारवाई करण्यात आली.

तरी नवीन नळ जोडणी करिता केलेल्या अर्जाच्या कागदपत्रांच्या फाईलवर स्वाक्षरी करणेकामी लोकसेवक श्री. जयस्वाल यांनी मला रू ५०००/—, श्रीमती. सावंत यांनी रू १०००/—, श्री. पटेल यांनी रू १०००/—तसेच सदर कार्यालयातील सहाय्यक अभियंता श्री शिंदे यांचे कार्यालयीन शिपाई कदम यांनी शिंदे साहेबांची सही घेवून देण्याकरीता रू. २,०००/— अशी माझेकडे एकूण रू.९०००/— इतकी लाचेची रक्कमेची मागणी केली. त्या अनुषंगाने केलेल्या कारवाई दरम्यान लोकसेवक शिपाई शरद कदम यांस माझेकडुन रू. २,०००/— अशी लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणुन तसेच यातील लोकसेवक श्री. जयस्वाल (कनिष्ठ अभियंता) श्रीमती. सांवत (पर्यवेक्षक), श्री.पटेल (मीटर रिडींग निरीक्षक) यांनी माझेकडे फाईल वर स्वाक्षरी करण्याकरीता स्वतःच्या आर्थिक फायद्याकरीता पारितोषण म्हणुन लाचेची मागणी केली तसेच लोकसेवक कदम यांनी स्वतःच्या आर्थिक फायद्याकरीता पारितोषण म्हणुन नमुद लाचेची रक्कमेची मागणी करून स्विकारताना रंगेहाथ पकडले म्हणुन माझी यातील लोकसेवकांविरोधात कायदेशीर तक्रार आहे. यातील लोकसेवकांशी माझे कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मी वाचून पाहिली असता, मी सांगितल्या प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

Gadhav

( गायत्री जाधव )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

शर्मिला रामदास खरे

Scanned with OKEN Scanner

(1)

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..........

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद ता. वे. ठि. तक्रारदार यांचेकडुन आरोपीत मजकूर यांनी नविन नळ कनेक्शन देण्याकरिता असलेल्या फॉर्मवर सही करण्याकरिता आरोपी लोकसेवक १ याने रु ५,०००/- आरोपी लोकसेवक क्र.2 यांनी रु १,०००/-, आरोपी लोकसेवक क्र.3 यांनी रु १,०००/- आणि आरोपी लोकसेवक क्र.४ यांनी रु 2,०००/- इतक्या लाचेची मागणी वरिष्ठांची सही आणुन देण्याकरिता केली होती. त्याप्रमाणे आरोपी लोकसेवक क्र.४ यांनी तक्रारदार यांच्याकडुन रु 2000/- ची लाच स्विकारली असुन त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणुन आरोपी क्र 1, 2, 3, 4 यांच्या विरुद्ध गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

..........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन.........., जिल्हा.........., राज्य..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).......... Rank.......... No..........
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.......... (3) Transferred to P. S. ..........
District.......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. शर्मिला रामदास खरे
तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

[signature]
पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name गायत्री मधुकर जाधव
पदनाम Rank पोलीस निरिक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ..........
Posting
Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..........
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner

फिर्यादी श्रीमती शर्मिला रामदास खरे यांचा स्वतंत्र जबाब नोंद करण्यात आला असुन तो सोबत जोडण्यात आला आहे.

Gruelkey

गायत्री जाधव
पोलीस निरिक्षक
ला.प्र.वि. मुंबई.

Scanned with OKEN Scanner